योजना: सीएसएसओ-एसडब्ल्यु आणि सी/०२/२००९-१०

सिडको
शहरांचे शिल्पकार

# महिला कल्याण उपक्रमांकरिता नवी मुंबईच्या विविध नोड्समध्ये भाडेपट्ट्यावर भूखंड उपलब्ध



www.cidcoindia.com

नवी मुंबई ही सिडकोने चौदा नोडस्‌मध्ये विकसित केलेली भारताची नियोजनबध्द महानगरी आहे. ज्यात शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक-सांस्कृतिक धार्मिक आणि मनोरंजनाच्या सर्वोत्तम सेवासुविधांचे जाळे विणले आहे. सिडकोने जाणीवपूर्वक या सेवासुविधांमध्ये सामाजिक कल्याण आणि महिला कल्याण या क्षेत्रांना अधिक प्राधान्य दिले आहे.

महिला कल्याण उपक्रमांकरिता सिडकोने सातत्याने विविध योजना अमलात आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात अशासकीय संस्था, विश्वस्त मंडळे आणि नवी मुंबईतील रहिवाश्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या संस्थांना सामाजिक-सांस्कृतिक हेतूंकरिता भूखंड व इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

आता सिडको मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०/ किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० या अंतर्गत नोंदणीकृत झालेल्या व नवी मुंबईतील महिलांनी स्थापन केलेल्या धर्मदाय संस्थांकडून महिला कल्याण उपक्रमांकरिता अर्ज मागवित आहोत.

## महिला कल्याण उपक्रमांकरिता नवी मुंबईत सिडको देत आहे भाडेपट्ट्यावर भूखंड

| अ. क्र. | नोड | सेक्टर क. | भूखंड क. | क्षेत्रफळ चौ.मी.मध्ये | वापर | चटईक्षेत्र निर्देशांक | पायाभूत किंमत प्रति चौ.मी. | अनामत इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ऐरोली | ८अ | २७ | १९५.०० | महिला कल्याण उपक्रम | १ | ४,१००.०० | ७९,९५०.०० |
| २ | ऐरोली | १७ | २३ | ४००.१३ | -॥- | १ | ४,५१०.०० | १,८०,४५९.०० |
| ३ | घणसोली | ६ | १५ | २७१.०३ | -॥- | १ | १,७५०.०० | ४७,४३०.०० |
| ४ | घणसोली | ६ | १७ | २९५.८१ | -॥- | १ | १,७५०.०० | ५१,७६७.०० |
| ५ | नेरूळ | २७ | ९४ | ४१९.०० | -॥- | १ | ६,०००.०० | २,५१,४००.०० |
| ६ | नेरूळ | ४८ | ४३ | २०९.०० | -॥- | १ | ६,०००.०० | १,२५,४००.०० |
| ७ | नवीन पनवेल (प.) | ९ | २८अ | २५०.०० | -॥- | १ | ३,५००.०० | ८७,५००.०० |

अनामत रक्कम डिमांड ड्राफ्ट/पेऑर्डरद्वारे 'सिडको लिमिटेड' या नावे मुंबई/नवी मुंबई येथे देय असावी. या योजनेची माहिती पुस्तिका प्रत्येकी रू. ४००/- प्रमाणे, दि. **१७-०७-२००९** ते **१७-०८-२००९** सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळता सोमवार ते शुक्रवार सकाळी ११.०० ते दुपारी १.०० व दुपारी २.०० ते सायं. ४.०० या काळात पुढील ठिकाणी उपलब्ध आहेत. १) पुस्तिका विक्री केंद्र. सिडको भवन, तळ मजला, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४. २) सिडको लिमिटेड, दुसरा मजला, निर्मल, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१. मोहोरबंद अर्ज वरील इसारा रक्कमेसह दि. **१८-०८-२००९** रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ठीक १.०० वाजेपर्यंत, सिडको भवन, तळमजला, सीबीडी, बेलापूर येथील पेटीत जमा कराव्यात. माहिती पुस्तिका तसेच अर्ज टपालाने/कुरीयरने पाठविल्यास स्वीकारल्या जाणार नाहीत.

**सिडको/जनसंपर्क/८८/२००९-१०**